## चित्रपट - बेलभंडार

मंत्रतंत्र, भोंदूगिरी करणाऱ्या दुष्टात्म्याच्या कारवायांना बळी पडलेल्या एका दुर्दैवी स्त्रीची ही कहाणी. फसवून लग्न करून दिला गेलेला नवरा बाहेरख्याली. विवाहापूर्वीचे नायिकेच्या स्वप्नदृश्यातले कृष्णभक्तिमय गीत 'नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली', पतीभक्त नायिकेचे 'मी नंदनवनी फिरते' हे गीत, चंगीभंगी नवरा क्लबमध्ये जातो तेथील 'वय माझं सोळा, जवानीचा मळा' हे उडतं पाश्चिमात्य नृत्यगीत आणि 'माडीवर' जातो तेथील 'नका बोलू असे दूर दूर बसून' ही मदमस्त लावणी आणि एक अंगाईगीत अशी विविध गीते आठवले यांनी या चित्रपटासाठी लिहिली आणि संगीतकार दत्ता डावजेकर यांनी त्यांचं चीज केलं.

## चित्रपट - बेलभंडार

### मी नंदनवनी फिरते

मी नंदनवनी फिरते
जागेपणी अन् उघड्या नयनी
स्वप्न मधुर बघते
नंदनवनी फिरते.

धनुष्य भंगुनी विजयी झाला
घनश्याम मज राम भेटला
त्रैलोक्याच्या लावण्याचे
चरणकमल चुरिते
मी नंदनवनी फिरते.

निळ्या सागरा गंगा मिळली
रामाची मी निळी साउली
दासी होऊनी एकपणाच्या
सिंहासनी बसते
मी नंदनवनी फिरते.

पतिव्रतेला पती हा ईश्वर
कुरवंडीन मी प्राण तयावर
पतीच्या चरणी सुख स्वर्गीचे
सहज मला मिळते
मी नंदनवनी फिरते.

## चित्रपट - बेलभंडार

### वय माझं सोळा जवानीचा मळा

वय माझं सोळा जवानीचा मळा
बहरूनी आला
रसरसला, राया रसरसला.

गोरे गोरे गाल, ओठ माझे लाल
मुलायम माल
मुसमुसला हो कसा मुसमुसला.

शुक शुक, शुक शुक करता
टक मक टक मक बघता
परदेशी दिसता
वाट चुकला हो पंछी वाट चुकला.

दारी होते उभी, पाहिली तुमची छबी
चंद्र जसा नभी, चंद्र नभी
झगमगला हो कसा झगमगला.

निमिषाचा खेळ, झाला हृदयाचा मेळ
लाऊ नका वेळ आता लाऊ नका वेळ
संग घेऊन चला मला संग घेऊन चला.

वय माझं सोळा, जवानीचा मळा
बहरूनी आला.

## चित्रपट - बेलभंडार

### नका बोलू असे दूर दूर बसून

नका बोलू असे दूर दूर बसून
माझ्यावर रुसून माझ्यावर रुसून
घ्या जवळ जवळ मला हसून
राया मनापासून हो मनापासून
नका बोलू असे दूर दूर बसून
माझ्यावर रुसून माझ्यावर रुसून.

तुमच्या डोळ्यातली मदिरा प्याले
गेले जिव्हारी आरपार भाले
हो मदनाचे भाले
गेले कुणीतरी उरी माझ्या डसून
अवचित घुसून
नका बोलू असे दूर दूर बसून
माझ्यावर रुसून माझ्यावर रुसून.

माझ्या जीवाची मंजुळ मैना
राया करू नका तिची अशी दैना
हो तिची अशी दैना
सोनं बावनकशी घ्या हो तुम्ही कसून
गहना घासून
नका बोलू असे दूर दूर बसून
माझ्यावर रुसून माझ्यावर रुसून.

घ्या हो तांबुल घालते मुखी
हो सांगा माझी चुकी
हो सांगा माझी चुकी
अहो रसिक रत्नपारखी, रत्नपारखी
शालू बुट्ट्याचा आज आले नेसून
टाका राग पुसून
नका बोलू असे दूर दूर बसून
माझ्यावर रुसून माझ्यावर रुसून.

## चित्रपट - बेलभंडार

### झोप घे रे चिमण्या सरदारा

झोप घे रे चिमण्या सरदारा
अंगाईच्या पदराखाली लपल्या अमृतधारा
झोप घे रे चिमण्या सरदारा

पोलादाची ज्यांची छाती
शिवरायाचे शूर सोबती
रणमर्दांच्या पायकुळी तुज जन्म लाभला वीरा
झोप घे रे चिमण्या सरदारा

लखलखता तेजाचा पुतळा
तशी तिकडची स्वारी बाळा
त्या तेजाच्या तालावरती माझा डौल पिसारा
झोप घे रे चिमण्या सरदारा

झोप राजसा आज सुखाने
उठ सकाळी हसतमुखाने
तूच एक आधार जिवलगा भार तुझ्यावर सारा
झोप घे रे चिमण्या सरदारा

## चित्रपट - बेलभंडार

### नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली

नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली
रे रीत नव्हे चांगली
सोड मला सोड, तुला भलती खोड लागली
रे भलती खोड लागली

एकटीला गाठुनिया धरलासी हात रे
पदराला झोम्बताना फोडीलासी माठ रे
लाडी गोडी पुरे तुझी, साडी माझी भिजली
नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली

वेळ आली काळी आज माझ्यावर पाळी
साजुक मी नार बाई नवी खुळी भोळी
खोड तुझी मोडणारी एक तरी भेटली
नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली

झाला बाई घात, तुझी वाजताच वेणू
अमृतात न्हाला माझा नाचे अणू रेणू
वेडी झाले वेडी, वेडी झाले
गोविंदाची गोडी मला लागली
नंदाच्या पोरा तुझी रीत नव्हे चांगली